**<u>वादी तर्फे साक्षीदार क्र. २ यांचा उलटतपास प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे वकील श्री. एस.बी.पांडे यांचेमार्फत शपथेवर पुढे सुरुः–</u>**

४. वादीने कोणती जमिन विकली होती, याची माहिती मला नाही. तसेच वादीने सदर जमिन कोणत्या वर्षी व किती रक्कमेला विकली, याची माहिती मला नाही. वादीने लग्नासाठी जमिन विक्री केली होती. वादीने माझयाकडे दोन लाख रुपये दहा वर्षापुर्वी ठेवले होते. त्यानंतर वादीने दोन लाख रुपये माझयाकडून एक वर्षाने परत घेतले. मी रक्कम रुपये दोन लाख रोख स्वरुपात माझ्या घरामध्ये ठेवले होते. रक्कम रुपये दोन लाख पैकी मी वादी यास रक्कम रुपये एक लाख दिले. वादी माझ्या घरी येवून रक्कम घेवून गेला होता. वादी व प्रतिवादी क्र. १ यांच्यामधील झालेला व्यवहार माझ्यासमक्ष झाला नाही. वादीने प्रतिवादी क्र. १ ला १,०१,०००/–रुपये (एक लाख एक हजार रु.) खरेदीखताच्या दिवशी दिले. सदरची रक्कम दुय्यम निबंधक यांचेसमक्ष देण्यात आले.

५. खरेदीखतातील मजकूर वादी यास वाचून दाखवला होता. वादीने खरेदीखतातील मजकूर मान्य केला होता. मी रस्त्यालगतची जमिन बघीतली आहे. सदर जमिनीमध्ये प्रतिवादी क्र.१ ने विहीर बांधली आहे किंवा नाही, या बाबत मला माहिती नाही. तसेच त्या जमिनीमध्ये कुपनलिका आहे किंवा नाही, या बाबतही मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीने माझ्याकडे रक्कम रुपेय दोन लाख ठेवण्यास दिले, त्यापैकी वादीने माझ्याकडून एक लाख रुपये परत घेतले, हे मी माझ्या सरतपासाच्या शपथपत्रामध्ये खोटे नमूद केले आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,

Digitally signed by PARVEZ ISHAQUEKHAN MOKASHI
Date: 2026.01.27 13:48:58 +0530

(पी. आय. मोकाशी)

दिवाणी न्यायाधीश,व. स्तर, औसा.

दिनांकः–२३.०१.२०२६.